

# संवाद

वर्षा देशपांडे

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४६९

REFBK-0023668
REFBK-0023668

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७६९
ग्रं. क्र. २३६६८
काव्य २६।७७
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ काव्य
२४६१
२३६६८
२६।११।८२

# संवाद

वर्षा देशपांडे

REFBK-0023668
REFBK-0023668

चेतश्री प्रकाशन
देशमुख चाळ, अमळनेर, जि. जळगाव.

चेतश्री प्रकाशन,
अमळनेर.

O

मुद्रण
मित्र प्रिंटिंग प्रेस,
धुळे.

O

मूल्य
दहा रुपये

O

प्रथमावृत्ती
ऑगस्ट '८२

O

मुखपृष्ठ
वैजनाथ दुलंगे

O

मुखपृष्ठ निर्मिती
फाईन प्रिंट्स्,
नाशिक.

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा'च्या नवलेखक अनुदान-योजनेखाली अनुदान मिळाले आहे.

माझे
परमपूज्य
स्वातंत्र्य-सैनिक वडील
कै. दत्तात्रय बाळकृष्ण देशपांडे
यांच्या स्मृतीस
प्रेमादरपूर्वक
समर्पित.

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ (वरून) | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १६ | ५ | धोरनं | धारेनं |
| १९ | ३१ | राहणर | राहणार |
| २३ | ९ | डसलेल | डसलेलं |
| २४ | ३० | थकन | थकून |
| २७ | १५ | शफारल्या | शेफारल्या |
| २७ | २३ | धम्रपान | धूम्रपान |
| २८ | ८ | जलघारा | जलधारा |

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| कविता | ५ |
| गवताची पात | ६ |
| आधार | ७ |
| नक्षी | ८ |
| जडावलेले डोळे | ९ |
| घाबरलेले डोळे | १० |
| ती | ११ |
| फडफड | १२ |
| मूकता | १३ |
| खुणा | १४ |
| हिरवी धग | १५ |
| झाडाची पानं | १७ |
| पाचोळा जळत नाही | १९ |
| अुन्हाची आर्तता | २० |
| दुष्काळग्रस्त | २१ |
| सत्य, न्याय, नीती आणि मी | २२ |
| वेदनेलाही | २३ |
| वेदनेस | २४ |
| धूमस | २५ |
| मी | २६ |
| ओला रस्ता | २७ |
| अश्रूंचा उःशाप | २९ |
| ताल | ३० |
| का ? | ३१ |
| अस्तित्व | ३२ |

नशा ३३
ज्वालांची शेज ३४
पावलांचे प्रतिध्वनी ३५
रात्र ३६
शोधाची प्रेरणा ३७
बदल ३८
साक्षात्कार ३९
रितेपण ४०
आधारासाठी आधार ४१
पराभूत पिंजरा ४२
प्रेरणा ४३
प्रेरणेसाठी ४४
अभिनय ४५
बंधनाचा स्पर्श ४६
अस्तित्वाचा स्पर्श ४७
प्रवास अस्तित्वाचा ४८
विश्वाच्या पार्श्वभूमीवर ४९
दृष्टी ५०
वादळ ५१
सांगता ५२
माणूस ५३
चक्र ५४
हिरवा तळ ५५
प्रवास हालचालींचा ५६
अलिप्त ५७
सहज ५८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४६१
क्र. क्र २३६६८
काव्य २६११।८२
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## १. कविता

क्षणाचा भार संभाळून
पहाटेला फुटलेली फळं
गुलाब चुरडलेल्या
सफरचंदासारखी.

असे आसावलेले व्रण
ओठात रुतलेल्या
दातांसारखे.

असह्यतेनं फोडलेली किंकाळी
नुकत्याच जन्मलेल्या
अर्भकासारखी.

आलेली जडता
उगवलेल्या नक्षत्राच्या
एकटेपणासारखी.

आघातलेला आवाजाचा
बोथट परीघ
ढळणाऱ्या रात्रीच्या
वर्तमानाच्या तालावर
भूतभविष्याचे पंख
हलवत राहतो.

कठोरतेची काजळी नखं
डोळ्यात खुपसताना
नशेचे दोनचार ठिपके
गालावर टेकवले जातात.

आत्म्याची नसबंदी
आधारलेल्या भुईला
जगवताना
कूस बदलत राहते.

## २. गवताची पात

पाकळ्या गळायला लागल्या
तेव्हा पानांनाच
विचार पडला
फुलाला ठेवावं तरी कोठे ?

अन्त:करणात जपलेली
गवताची पात
धारदार चेहेऱ्यानं
वाऱ्याच्या
उघड्या चेहेऱ्यावर
वार करायला लागली
तर

मिटल्या डोळ्यापुढे
माती
चेहरा तरी
कोणाचा साकार करणार ?

## ३. आधार

दु:ख उशाला घेऊन झोपायचं
तेव्हा आधार होतात पडदे.

पडद्यावरील
नाजुक कलाकुसर
डिझाईनमधून
खिजवत राहते.

वाटतं उठावं पटकन
आणि काढून टाकावी
सगळी कलाकुसर.

पण पडदा फाटला तर ...

आणि मग
तसंच झोपून रहावं
तर झोप येत नाही.
कोणीतरी आसपास
चिटचिटत असतं.

वैतागून उसं बाजूला करते
तर ... तर ...
मला पहावतच नाही
माझं नग्न स्वरूप.

## ४. नक्षी

रस्ते कोमेजतात
तेव्हा झाडांना पाय फुटतात;
झाडांचे पाय रक्ताळतात
तेव्हा पानांची कलेवरं
रस्त्यावर विखुरली जातात.

फुलांना पंख फुटतात
तेव्हा सुगंधातून
पाचोळ्याचं दैवत
पुजलं जातं.

सांजसकाळच्या भाषेत
झाड जरा हिरवं होतं.

अुन्हाळी चेहेऱ्यानं
पाहणारा रस्ता
ओळखीच्या पाखरांना
झाडावर नेऊन बसवतो.

काचेच्या पेल्यात
कोरलेली नक्षी
पत्थरवत् दृष्टीने
आपल्या देहाकडे
पुन्हा पुन्हा
पाहात राहते.

## ५. जडावलेले डोळे

विवस्त्र झालेल्या भावना
आरशात पाहताना
चौकटीचं भरलेपण
गालातल्या गालात
हसत राहतं.

शहाणपण कोरताना
मातीच्या रस्त्यावर
मळलेली साडीची किनार
धुळीत झटकलेलं
आपलं प्रतिबिंब
विसरत राहते.

जडावलेले डोळे
मातीतले निखारे शोधत
आपली भाजलेली प्रतिमा
पुन्हा पुन्हा
कुरवाळत राहतात.

## ६. घाबरलेले डोळे

डोळे घाबरतात
तेव्हा सूर्य
उगवलेला असतो.

असुरी रात्रीच्या
कुशीतला खुपसलेला खंजीर
ओढून
बाहेर फेकलेला असतो.

भळभळ वाहणारं रक्त
घटाघट पिणारा अंधार
उशाला कुबडी घेऊन
शान्त झोपी गेलेला असतो.

डोळ्यात झोपलेली रात्र
आकाशात उगवलेल्या सूर्याला
सामोरी जात असते.

नजरानजर होताच
दिपलेल्या क्षणाचे डोळे
अन्तःकरणभर फिरून येतात.

आणि ....
ओठानं फेकलेली
शब्दांची वेटोळी
पाहात बसतात
नग्न स्वरूपात
घाबरलेले डोळे.

## ७. ती

ती पाहते तेव्हा
झाड फुलांनी शृंगारलेलं नसतं.
फुलांचा शृंगार
कधी ऐकिवात नसतो.
फुलांचा शृंगार
कधी भविष्यात नसतो.

पण झाडाखालच्या मातीत
मात्र सापडतात
वासांची सूक्ष्म कलेवरं.

ती डोळे बंद करते
तेव्हा रात्र असते.
रात्र असते
तेव्हा ती डोळे बंद करते.

ती डोळे बंद करते
तेव्हा लाल झालेल्या डोळ्यातली
ओली रात्र वितळत असते
सुगंधाच्या बेहोषीत
तल्लीन होऊन
नाचणाऱ्या
मृत्यूसारखी.

## ८. फडफड

खून झालेल्या क्षणांची
फुटलेली वादळं
रक्तातून थयथय
नाचायला लागतात.

तेव्हा ...
मातीच्या कुशीत
निवांत झोपलेली स्वप्नं
अलगद तरंगायला लागतात.

आकार पुसलेली पावलं
एकात एक जुळवून
ऐकू न येणाऱ्या नादाचं
अन्तर्मुख होऊन
निरीक्षण केलं जातं.

अखेर शेवटी
आकारालाच नाद फुटतात
आणि पानांची फडफड
ऐकू येते.

## ९. मूकता

आंधळा नसलेला रस्ता
डोळे उघडे ठेवून चालताना
किरमिजी रंगाचे दगड
फेकत चालला होता.

मनात उमटलेली
प्रतिकाराची वादळं
ओठातून मिटताना

अश्रूंचे गोल ठिपके
हिणकसपणे
चिडवत होते.

बाजूला दिसणाऱ्या
प्रामाणिकपणाच्या कबरी
अस्तित्वाची
जाहिरात करत होत्या.

वास्तववादाचे आरसे
झोपडीच्या दरवाजात
उभे राहताना
जास्वंदीच्या
फुलांचा लाल पारा
आरशामागे
दडला होता.

## १०. खुणा

आसासून उठलेल्या
दर्वबिंदूंच्या बाजारात
एक आस
विकायला आली होती.

दावणीला बांधलेल्या म्हशीसारखी
ती ढुश्या देत होती.
पानामध्ये गुंडाळलेल्या
धुळीच्या वैभवानं
ती बहरून आली होती.

अेकटीचाच दर्प
अुसळलेल्या कंदर्पात
थयथय नाचत होता.

पिकलेल्या वाऱ्याच्या
उघडच्या डोळ्यातून
चांदणं टिपटिप गळत होतं.

ओल्या वादळाच्या खुणा
आडोशाला उभ्या होत्या.

## ११. हिरवी धग

अहंकार वाहूनच गेलाय
आधाराच्या रोखाने रानात.
औदुंबराची पानं मोजता येत नाहीत
नदीच्या पाण्यामुळे.

वेदनांचा तळ शोधून काढलाय
माझ्याच ओल्या तळहाताने
अन् आता बोटं मिटता येत नाहीत
ताठरलेल्या थंडीने.

कोठे शेकोटीच दिसत नाही
जळक्या पाचोळ्याची.
त्यालाच कुरतडून काढलंय
हिरव्या हिरवळीनं.
पण तिला होरपळताच येत नाही
हिरव्या धगीत.

भरल्या आभाळात तू असा उभा
क्षितिजाच्या कडा मोजत
तर अवखळ वाऱ्याला
धावता येत नाही
हृदयाच्या चिमटीतून.

रंगारंगाची बुजगावणी
सोनेरी रंगाला खुलवतात.
पण काळीकुट्ट कुरूपता
शत्रुत्वाचा घाट सोडत नाही
मायेचे पिळे खांद्यावरून सैल सोडताना.

असह्यतेच्या शिखराबरून
ऋचा ऐकू येत नाहीत
पाण्यातले भोवरे मनात
निरखताना.

रक्ताचं मोजमाप
उन्हाच्या आडोशाला करताना

अन्तरात अन्तर
मिसळून गेलंय.

साकळलेले प्रतिध्वनी
कापणार नाहीत रहस्य
बोथट धोरनं
घामजलेलं करपलेलं

वावटळीच्या किनाऱ्यावर
शिक्का मारता येत नाही
पाषाणात खंजीर खुपसून.

## १२. झाडाची पानं

समोरच्या झाडाची पानं
गोल ठसा उमटवतात
तेव्हा त्यांचा आकार
त्रिकोणी असतो.

पानांना गोलच ठसा हवा असतो
तेव्हा त्यांना मिळतो
त्रिकोणीच आकार.

गोलव्यानं झपाटलेलं असतं
का आकारानं गिळलेलं असतं त्यांना
समजत नाही.
पण...

ठसा आणि आकार
आकार आणि ठसा
पानाभोवती
फिरतात.

आता आकारच फुलतात
हिरव्या माध्यमातून
तेव्हा हिरवळलेला
कोना कोना बहरून येतो.

पण पाचोळ्याची हाक
ऐकू येत नाही.
जवळची जाईची वेल
देव पुसायला
आलेली असते.

शहारलेली तिची पाकळी
डोळे भरून पाहता येते.

अखेर
पाचोळा
आपलं घडयाळ पाहतो.

केविलवाणे काटे
दोन रेषांवर
थबकलेले दिसतात.

आसक्त डोळ्यातून
धारा सुरू होतात.

पाखरांचे कोवळे पंख
टपकन पानावर बसतात.
जाईच्या पाकळीसकट
पान
मातीवर
फेकलं जातं.

## १३. पाचोळा जळत नाही

पाचोळा जळत नाही.
ओल्या हळदीला दुखवायचं ?
हवा तरंगत नाही.
वाळू घशात कोंबायची ?
वास येत नाही.
हिंगानं नाक सोलायचं ?
पाणी प्यायला नाही.
अश्रूंचे प्याले प्यायचे ?
नशा चढत नाही.
नागिणीचं जहर प्यायचं ?
आशा दिसत नाही.
निराशेचा खून करायचा ?
जीवन दिसत नाही.
मृत्यूचा खून करायचा ?
सहन होत नाही.
असह्यतेचा खून करायचा ?
विकत नाही फूल.
खरेदीचा खून करायचा ?
फुलता येत नाही.
फुलण्याचा खून करायचा ?
ठिणग्या वेचता येत नाहीत.
हात जाळायचे ?
मोजता येत नाही.
माप जाळायचं ?
जळता येत नाही.
जीवन जाळायचं ?
तरीसुद्धा हवा हवाच राहणार
माती मातीच राहणार
आकाश आकाशच राहणार
झाड झाडच राहणार
अन पाचोळा पाचोळाच राहणर
उदास !
भकास !

## १४. अुन्हाची आर्तता

अशी आरस्पानी संध्याकाळ
उन्हाच्या सावलीत
दबा धरून बसते.

पंख हलवताना
पक्षिणीची माया
पिल्लाला भरवत राहते.

मृत्यूचे पडदे
आजूबाजूला पांगत असताना
अुसासे अुबवत राहते.

मावळतीच्या लाटांवर
पंखांची पिसं पाखडताना
चिमण्याची झेप
अवती भवती
पंखावत जाते.

चित्रात वर्णन केलेली
ही अनावर ओढ
अुन्हाची आर्तता
रिचवत राहते.

## १५. दुष्काळग्रस्त

एका पेल्यासाठी अश्रू धुवायचे डोळ्यांनी.
एका घासासाठी दिशा ओळखायच्या
अनवाणी पायांनी.
एका कवडीसाठी
लोहचुंबक चुंबायचा तडतडणाऱ्या ओठांनी.
पैसे अभिमानाला लागत नाहीत
काटेरीतल्या बोरांसारखे
आणि हिरवी नोटही
पाण्यात विरघळत नाही
लाल रक्तासारखी.
चौघडी पांघरली तर रुपेल कुसू मायेचं
पण जमिनीवर उभं रहायला
कोणी जामीन राहत नाही.
सप्ताहाचे सात दिवस उगवतात क्षितिजावर,
पोकळी भरून काढायला पैलतीर येत नाही.
उगाचच धापा टाकायच्या एका अबोल अजाण क्षणासाठी
अन् आंधळ्याची काठी शोधताना
पिकली पानं पिळायची मनात.
सुरकुतलेली कातडी काळी
विकता येते सळसळत्या धारांना
पण आंधळ्या डोळ्यातून रक्त ठिबकतं
बैलांची कातडी सोलवटताना.
घाव घालताना कुदळ विव्हळते
विधवेचं फटफटीत कपाळ पाहून.
गिरफदार झालेत हात
जीवनाचं ओझं झेलताना.
पाचोळा जाळायचा ठिणग्याठिणग्यांनी,
ठिणग्या ठेवायच्या पोटात अन् दाणा ठेवायचा
चिमण्या चोचीत गवसलेला.
रोजच ठिणग्या मरतात मेल्या मरुभूमीत.
भावनांनी तिरडी बांधलीय
पारणं फेडायला उपासाचं.
अन् बंदुक रोखल्यावर
प्रेत नेलंच पाहिजे मसणवट्यात
सांगाड्यांनी.

## १६. सत्य, न्याय, नीती आणि मी

अंधाराची सगळी रूपं
येतात विळखा घालायला.
दिवसरात्र मागणी केलेलं
एक अदृश्य भूत
मानगुटावर येऊन बसतं.
पायाखाली पाटी तयार झालेली असते —
सत्य - न्याय - नीती.

अंधाराचं एकेक टोक
प्रतिष्ठा, राजकारण, अधिकार, सत्ता
यांच्या बॅनरमधून मिरवत असतं.

मी सगळ्यांना
काठी घेऊन ठोकते.
माझ्या हातातनं
रक्त सांडतं.

ओलेत्या रक्तानं माझ्या रस्त्यावर मी
पाच पाच बोटं उमटवते.
पाऊल पडलं की उत्तर द्यावं लागतं.
पंचनामा होतो माझ्या रक्ताचा.

मी पाऊलवाटेच्या तुरुंगात जाते.
जातभाई नसतात कोणी
एकटीच असते
खडी फोडायला.

खडी फोडताना खडी हाताला लागते
आणि पुन्हा रक्त सांडतं.
मी रक्ता-रक्ताची तुलना करते.
ग्रुपिंग करून माझं मलाच मी
रक्त देते.

मग अंधाराची पूजा
रोज मांडत बसते.
अंधार खूष झाला की
टाळ्या पिटते
अगदी लहान मुलासारख्या.

# १७. वेदनेलाही

वेदनेलाही डोळे असतात.
अश्रूच्या काचेचे.
पाय असतात
परीटघडीच्या पैरणीचे.
हात घामाने ठिबकत
हातकडीत झोपलेले.
वेदनेचंही डोकं ठेचत असतं
काहूराच्या कृत्यांनी ठणकणारे पत्थर.
हृदय विव्हळत असतं विखारांनी डसलेलं.
अधर 'स्स् ... हाय' सुकतात
कुदकळचांनी रक्ताळलेले.
मन आचके मोजत असतं
बर्फाळलेल्या फरसबंदीवर.
वेदनेलाही आठवण औषध पाजत असते
काटेरी कुंपणाचे.
वेदनेलाही वेदना असते
जीवनाच्या सक्तीच्या विवशतेची.
वेदनेचीही जाणीव जळजळत असते
काळजाकडे येणाऱ्या कट्यारीतून.
वेदनेचीही विनंती असते हात जोडून
काकडून कापणाऱ्या स्वराला.
वेदनेचेही कान कुरवळत असतात अंगुली
निस्तब्ध शांतीच्या कुंतलातून.
तरीही वेड संपलेलं नसतं
एकलेपणाच्या प्रशंसेचं.
वेदनेलाही आनन्द असतो
ज्योतीतल्या ठिणग्यांचा.
प्यास असते
लाव्हारसाची.
आस असते
अधाशी अतृप्तीची.
पंख असतात
स्मृतींच्या सारस्वताचे.

## १८. वेदनेस

वेदने, जाऊ नकोस
मातीचा पावलं पांगळी करून,
अक्षरं पोरकी करून.

फुलू दे अश्रूंची फुलबाग
तेरड्याच्या रानासारखी.

वेदनेला दिवस गेलेत
बहरलेल्या सोहाळ्यात
बगीच्याच्या सावलीत
स्वैर हिंडताना.

तुझी ही उभार
एकमतानं ठरलेली
पाहू दे मला डोळे भरून
उमललेल्या प्राजक्तासारखी.

माझ्या मुठीतली वाळू
बोगदे बांधताना
तहानेलीय
तृप्तीसारखी.

ओवाळताना इंद्रधनुष्य
लकेर विरलीय आनन्दाच्या कोंदणात
खड्यासारखी.

उगाच ठेच लागलीय
आकाशदिवा पहाताना
टाचा उंचावून.

ओठात चमचा ठेवून
दूध पाजीन तुला मी
गुदमरलेल्या श्वासांचं.

तुझ्यासाठी
राखून ठेवलीत
आनन्दाची कारंजं
थकन गेलेली.

## १९. धूमस

धुमसत्या पावलांच्या साक्षीला
अबोलींची वहिवाट
मरणानंतर कोणी पाहिलीय
थडग्यावरची पहाट !

वेष बदलून येतात निखारे
परीटघडीची कुरबूर सांगायला.
अंधार पांघरून येतात पाखरं
काळोखाची कुजबुज ऐकायला.

उजेड घेऊन येतो करवत
आवाज कापायची.
आवाज घेऊन येतो बंदूक
उजेडाला मारायची.

असा प्रीतिसंवाद चालतो
पाणपोई खोलण्यासाठी.

शब्द ऐकले नाहीत
शब्द विसरताना.

पावलं मोजली नाहीत
पाऊल मापताना.

हात हाताळले नाहीत
हात कोरताना.

सगळाच घंटेचा बडिवार
ठणठणाट पिताना.

## २०. मी

मी माझ्यातून सुटणार नाही
मनानं कात टाकली तरी.
खोल खोल कप्प्यातली जाणीव
थरारणार नाही कुडकुडली तरी.

रंगीबेरंगी काठ्यांची संख्या
संपणार नाही धार कातरली तरी.

शराब प्यायल्याची नशा
संपणार नाही ओठ जळले तरी.
रंगवली होती धारदार पानं
फुलांना कापण्यासाठी.

मळली होती माती
मूठमाती देण्यासाठी.
ओल्या कुडत्याच्या आत
भाजत होती घामेजलेली.

जळका पलिता जाळत होता
जळका पाला कुजलेला.

## २१. ओला रस्ता

ओला रस्ता वितळत चाललाय
स्वाभिमानाच्या मुशीत.
आला गेला समजून गेला
पाचोळ्याचा शाप.

अस्ताव्यस्त पसरली होती
ठिणगी न् ठिणगी
हळव्या शपथा कटोऱ्यात फेकताना.
लचके तोडताना स्वतःचे
माती ढासळत होती
बुरुजाबुरुजावरून.

अुखडलेल्या अनावृत वेगानं
निमसरकारी धान्य
ओल्या हळदीत रंगवलं होतं.

वाट चुकलेल्या वाटाण्याच्या अक्षता
दीडदमडीच्या शफारल्या झोपडीत
पाण्याला विनाकारण
टाकी लावताना
थकून गेल्या होत्या.

अेकच एक घास
केन्द्रातली नीरा झोकून
ताडीपुढे उभा होता.

अधाशी अतृप्त नजरेची वर्तुळं.
धम्रपान करताना
टिकल्याटिकल्यांची साडी
पायघोळ नेसून
ओल्या रस्त्याला
वेडावत होती.

हात टाकला म्हणून
मुलूख मैदानी करणारी तोफ
अधांतरी तरंगत होती
बंदुकीच्या रोखलेल्या नेमबाजीत.

पापण्यांच्या पदरात
दाटीवाटीनं गुंडाळलेली माया
जिवन्त थडग्यावर फेकून
आशा निराशेच्या हातात
हात मिसळून
सरकत्या पायांना सावरत
कठपुतळी चालली होती.

थबथबलेल्या जलधारा
ओला रस्ता शोधत शोधत
डोळ्यात प्राण आणून
किनाऱ्याशी
मैत्री करत होत्या.

सुटलेल्या निऱ्या सावरता सावरता
छोट्या तरंगाच्या ज्वाला
ओल्या रस्त्याच्या कपाळावरचे
कुरळे केस बाजूस सारत
कुरवाळत होत्या.

## २२. अश्रूंचा उःशाप

खचलेल्या दरीतून वर पहायचं
निळ्या आभाळातल्या पाखरांकडे.
डोळे भोवळले तर घट्ट मिटून घ्यायचे
अन्तःकरणातून उसळणारे.

मधून मधून आवरायचा घंटानाद
हृदयात ठणाणणारा.
दरीत कोसळणाऱ्या दगडांकडे पहायचं
अधाशीपणानं एकरूपतेसाठी.

पोसायची पहाट
नदीतल्या ठिणग्या वेचण्यासाठी.
मौनातले अर्थ लावायचे
साखळीचे हुक शोधण्यासाठी.

हाती आलेला एकेक मातीचा कण उधळायचा
आशिर्वाद म्हणून.

येणाऱ्या हुंदक्यांचा धिक्कार करायचा
पुढच्या पावलाच्या स्वागतासाठी.

बेगडी दुनिया हाताने बाजूला सारायची
हृदयाची साक्ष ठेवून.

अवघडलेल्या क्षणाची सुटका करायची
कर्तव्याचे माप म्हणून.
मृत्यूच्या भूताला वेडावून दाखवायचं
जाणीवेचं थडगं बनून.

## २३. ताल

काळी काळी फुलं
ज्वालांच्या तांडवनृत्यात.

अधांतरी पावलांची
अेक लय थरारताना
धारदार वस्त्रांच्या
अणकुचीदार निऱ्या वेचणारी.

हवेत पकडलेल्या संगीताची
वर खाली होणारी सावली
चिंब भिजलेल्या डोळ्यांच्या
धारांतून आग ओतणारी.

विझत आलेल्या बाहुल्या
वितळताना
संथ झालेला ताल

रेशमी गजरात
उभा राहिलेला.

## २४. का ?

चिध्या झालेल्या
लाटासुद्धा येतात का
अथांग बनायला ?

का लाटा अथांगच नसतात ?
मग समुद्र अथांग असतो
म्हणजे काय असतं ?
लाटांच्या तुटक्या चित्रावर
आधारलेलं एक स्वप्न
का अस्तित्व ?

तुटलेली असतात नाती
विटक्या कबुतरासारखी ?
मग वाळूतून सुटलेले रस्ते
लाटांना का बोलावतात ?

मऊ मऊ वाळू
अशी भुसभुशीत
का होते
पारदर्शक स्वप्नांसारखी ?

अथांगतासुद्धा
ओलींचिंब व्हावी लागते का
स्वप्नांसारखी ?

नितळ दिसणाऱ्या
कातळावर
वलयं
काळीच का दिसतात ?

## २५. अस्तित्व

विझलेले किनारे
सोडवून घेता घेता
अेक अुदास सावली
अुसासे टाकत राहते.

पांघरलेली कोवळी झूल
कोमलतेच्या पुलावरून
येरझारा घालताना
निखारे हुंगत राहते.

वास चुकलेली
हिरवी रात्र
मिरवणुकीच्या कुशीतली
दोन चार फुलं घेऊन
निखारे माळत राहते.

हिरवी रानपाखरं
आकाशाची आभाळलेली
रानझरी सोबत
ओळखीच्या सावल्यांतून
ओळखीचे मातीचे कण
टिपत राहतात.

रानवेड्या काट्यांना
पिवळ्याधमक केवड्यातून
अुमलवणारी धुंदी

शून्य असलेल्या
काजव्यांची माळ जपत
अस्तित्वाच्या कवचातून
फुटत राहते.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४६९
दा. क्र. २३४६८
काव्य २६१९म
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## २६. नशा

झिंगलेल्या ज्वाला
आकाश ओठावर ठेवून
मागितलेल्या क्षणाचा
कडकडून चावा घेतात.

डोळ्यात झिंगलेली
आकाश प्यालेली रात्र
शब्दांच्या बाजेवरून
ऐलतीर पैलतीर
नाण्यासारखी वाजवत राहते.

ओळखीची माती
कुशीत घेतलेली पहाट
रानपाखरांच्या चोचीतून
बोथट करत राहते.

## २७. ज्वालांची शेज

क्षितिजजाळं व्याकुळताना
पेटलेल्या दिशा
ज्वालांना
हलकेच फुंकर घालतात.

नशेत पेरलेल्या
सवेदनांची थरथर
आकाशाच्या
पोरक्या भाषेत
होरपळून निघते.

कातडीवर उमटलेली
संगीताची जखमबद्ध लय
तुटलेल्या सावल्यांच्या
प्रक्षुब्ध हालचालीतून
चक्राकार घुमत राहते.

पावलांच्या खुणांवर
मारलेली थप्पड
उकळलेल्या रक्ताच्या
पाऊलवाटांवर
श्वास मोजत फिरते.

अस्तित्वाच्या
कवेत घेतलली
चौपदरी झुळूक
ज्वालांच्या उशाला
शेज अंथरत राहते

## २८. पावलांचे प्रतिध्वनी

गच्च फुलांचा हार
केविलवाण्या चौकटीवर टांगलेला.
हातांचा मी-पणा
स्पर्श न करणारा.

फुलाफुलांतून ओसंडणारा
कोमल पाकळ्यांतून
कोमेजून जाणारा.

नाजुकतेतून झिरपणारा रंग
आपल्याच छायेला शृंगारणारा.

अथांगतेच्या गप्पा
निळ्या वलयातून
तरंगताना.

कोसळलेली ज्वालांची सर
मिटल्या डोळ्यातून पापण्या पिणारी.
चिरणाऱ्या सावल्या
ओळखीच्या उन्हातून झिरपणाऱ्या.

वेचलेल्या पाकळ्यांचे
दाहक रंग
हातात चुरडलेल्या
काचेच्या रक्ताला प्रतिबिंबासारखे.

ओळखीची स्मशानवाट
ज्वालांच्या अवकाशात
बळी गेलेल्या
प्रेतासारखी.

पावलांचे प्रतिध्वनी
पुसत गेलेल्या
अनोळखी चित्रांसारखे.

## २९. रात्र

अंधार पेटवायचा तर
ज्वाला उपाशी
थंडावलेल्या.

जवळीक साधलेली
उन्हाळी भीती
हिरव्या पेटाऱ्यात घालून
शवासारखी पुरलेली.

आधारलेल्या
एकुलत्या एक हिरवळीवर
लाल रक्त सांडलेलं.

ओठात ठेवलेली
पिकलेली संध्याकाळ
झोपेच्या उशागतीला
काव काव करणारी.

चित्र काठावर लपेटून
अुध्वस्त वाहणारी
थिजलेली रात्र

अंधारून आलेल्या
डोळ्यात
डोकावून
पाहात राहाणारी.

## ३०. शोधाची प्रेरणा

पाण्यात कोसळणारी वलयं
वलयांकडेच पाहात बसतात.
प्रवाहाचं तुटलेलं नातं
प्रवाहात सांधत बसतात.

चकाकणारी नक्षी खेळवताना
प्रकाशगर्भ पाण्याची लकेर
अस्तित्व शोधत फिरते.

विसरलेल्या क्षितिजाची
दडपलेली गाज
पाण्याभोवती
समुद्रासारखी फिरत राहते.

एकटयाच पेटलेल्या
आकाशाची ओढाळ नजर
मातीच्या कुशीत
विसावा शोधत राहते.

## ३१. बदल

मातीच्या पेहेरावात
बदललेले रिक्त अुसासे
आशयघन अुन्हाच्या सावलीला
थबकून उभे होते.

थकलेल्या
तेजदार सावलीचा कार्यक्रम
अभिनयात रंग भरताना
तिच्या कपाळावरची बट
हलकेच बाजूस सारत होता.

प्रक्षुब्ध चुंबनात
हरवलेली कर्णभूषणं
गालावरचे अुसने पापुद्रे
सोडवत होती.

डिवचलेल्या
तजेलदार ओळखपत्राची ध्वनिमुद्रिका
कपाळावर चिकटवताना
ओळखीच्या रंगभूमीवर
पावलं अडखळत पडत होती.

ओठच प्यायले होते
ओठांनी
विषारी फुत्कार.

संपलेल्या उजेडाची
संपलेल्या काळोखाची
एक प्रभात
डोळ्यात शब्द रिचवताना
निश्चेष्ट पडली होती.

## ३२. साक्षात्कार

एका कोनातून पाहिलं तर
झाड संपूर्ण
फुलारलेलं दिसणारं.

समोरून पाहिलं तर
पानात पान
फांदीत फांदी
आणि आकारात आकार
मिसळू पाहाणारे.

निळ्या पार्श्वभूमीला
नेहमीच लागलेली
निर्विकल्प समाधी
आणि वाऱ्याची नेहमीच
निर्गुण निराकार सळसळ
एका काठावरून
दुसऱ्या काठावर
दौडत जाणारी.

अभिनयाच्या
कुशल कारागीरांना
आमंत्रण केलं.

सुजलेला परीघ
आडवा धरून पाहिला.
ओठ शिवलेला समुद्र
खांद्यावर टाकला.

आता फक्त
अन्तःकरणाची दोरी
रस्त्यावरून
फरकटत जाताना
कोपऱ्यावर
लोंबलेली.

## ३३. रितेपण

मातीचा स्पर्श झालेले
माझे पाय
पायही नव्हते.
तो होता एक
आकृतीचा विवश आविष्कार.

माझ्या हातांनी
मी मातीची ओंजळ भरली
तर रिकाम्या हातात
मातीचा सलसुद्धा मावेना.

वस्तीला आलेल्या
दोन चार फुलांना
मी प्रश्न विचारला -
" सुगंधाचा स्पर्श
तुम्ही भोगला का ?"
अुत्तरादाखल फुलं फक्त हसली.
हसण्यातून ओसंडलेली दुपार
मी पुन्हा तपासून पाहिली.

पाकळ्यातून विलग झालेले
फुलांचे ओठ
फुलांनी
चक्क मिटून घेतले होते.

## ३४. आधारासाठी आधार

रक्ताळलेले पाय माझे –
मी मातीचे डंख
मोजून पाहिले.

डंखाडंखात भिनलेली
मातीची छाया
मी गोंजारून पाहिली
तेव्हा मीच मला केलेल्या जखमा
उसासत राहिल्या.

ओठांना सुटलेला कंप
मी रस्त्याला फेकून मारला.

मगरूर जात माझी
कळवळली, चित्कारली
पण ...
माझ्याच
छातीशी येऊन बिलगली.

# ३५. पराभूत पिंजरा

पाकळी पाकळी हलकी होते,
परागकणही भूलून जातात.
एका अनामिक क्षणाची ओढ
अथांग अलिप्तता बनते
पराभूत पिंजऱ्यात.

जवळचे दाणे संपलेले असतात
चोचीवर चोच घासून.
ओठातलं रक्त
डोळ्यात तरंगत असतं.

गतीचे रंग मातीत मिसळून
निळी सावजं
भिंती लिंपायला येतात.

अशक्त झालेल्या डोळ्यातली ओल
अेक सोबत घेऊन येते
रबरी फुग्यासारखी.
तिची ताणलेली स्थिती
ऋतुचक्राच्या भोवऱ्यातील
संथ फिरकीसारखी
धारदार बनते.

अस्वस्थ दिशांच्या
जाळीदार बैठकीत
जाळीदार अवस्थेत
आसमन्ताचा आकार घेऊन
फुलं गुंफलेली.

अेकेक स्वच्छ धागा
तापलेल्या तळव्यांनी विणलेला.
निराशेची धग विझून गेलेली.
आशेची कोवळी अुन्हंही
करपून गेलेली.

## ३६. प्रेरणा

हिरवं झाड मी गोंजारून पाहिलं.
गदगदा हलणाऱ्या सावल्या
मी डोळयात साठवल्या.

मनत्वाला फुटलेले पंख
मी विस्तारून
हवेत सोडले.

ओंजळीत आलेल्या फुलांची
मी चुंबनं घेतली.
ओठांना चिकटलेलं रक्त
सर्वांगावर विस्तारलं.

आता माझ्या
रक्ताळलेल्या चेहेऱ्यावर
एक खुनशी हास्य मी सोडलं.

संथ चिकटलेल्या रंगांनी
घराचा नंबर विचारला.
टेलिफोनच्या आकडयांवरून
गरगरणारी बोटं
मी माझ्या छातीवर स्थिर केली.

रिकामा पडलेला
कुचकामी खडा
मी रस्त्यात
ठोकून टाकला.

आता माझ्या ओंजळी
भरून आल्या होत्या.

झरझर झरणाऱ्या आकाशधारेत
थंडावलेली पाऊलवाट
उन्हाची वाट पाहात
स्तब्ध उभी होती.

## ३७. प्रेरणेसाठी

अुन्हाच्या राजघराण्यावर
मी अंडी फेकून मारली.
कळवळलेली तृप्त हाक
मी झेलून पाहिली.

गतीची बेभान चाल
कळ दाबून
मी सुरू केली.

हलणाऱ्या चित्रात
मी झाडं
गोंदून पाहिली.

फुलपंखी पंखांची
हसरी स्मितं
मी माझ्या ओठात
उलगडून ठेवली.

रिक्त वाळलेल्या चुंबनावर
मी थोडसं रक्त
शिंपडून पाहिलं.

आशेनं आलेला ओलावा
मी दोन्हीं हातात
कुस्करून पाहिला.

तेव्हा रक्तानं पचवलेली लाली
हिरव्या अंगानं
विस्तारत होती.

## ३८. अभिनय

आवडलेल्या सगळ्या प्रतीकांना
मी एकेक ठोकळा दिला बसायला.
स्वागताला वाजंत्री वाजवली
मूक नृत्याच्या अभिव्यक्तीची.

खेळ ठोकलाच गेला होता पायांमध्ये.
झुगारून द्यायचा प्रयत्न केला तर ...
तो आणखीच रुपत गेला

एखाद्याच्या
ओठावरची लाली पाहून
मी का स्मितं मोजायची ?
रक्ताची दुहेरी नाती
का अश्रूंनी ठोकरायची ?

वेळच लागला तर
मीही पावती देऊ शकते
माझ्या अस्तित्वाची.

नको ते उपकारलेलं
ओलं पाऊल !

मीही विसळलेलं आहे
माझ्या ममत्वाचं फुलपात्र
बिनव्याजी पाण्यात.

सोप्या सोप्या क्षणांना
आहुती देताना
काळ कसा सोकावलाय.

त्यानं ओठही पिऊन घेतले
तर स्मित कोणासाठी
आणि कसं करायचं ?

## ३९. बंधनाचा स्पर्श

खोल्या बांधता येत नाहीत
मग कुंपण घालायची
हुरहुक का ?

भ्यायचं तरी कोणाला–
न बांधलेल्या खोल्यांना
का बांधलेल्या कुंपणाला ?

डोळे कसे स्थिरावल्यासारखे
लाटेवर अुसळून येणारे.

हात उंचावून
हवेला खूण दाखवली.
ओल्या मिठीत विनाकारणच
धुराचे डोळे आले.

चिंब भिजलेल्या बेहोषीत
अंधारच कसा शहाणासुरता
तरंगत्या होडीला घेऊन धावणारा ?

वाटा फुटलेल्या रुंद वाटांना
मी दिलेला निरोप पोचला नव्हता.
मग मीच निरोप बनले आणि हवेत फेकलेल्या
कागदाच्या भेंडोळ्यासारखी प्रवास करून आले.

ओठात गच्च बांधलेला निलाजरेपणा
जागोजागी बोचक्यासारखा टेकवत राहिले.
जड झालेलं ओझं मी पायदळी तुडवलं.

रक्ताची जोखीम अचानक किंचाळली
तेव्हा कुंपणातून हाक आली होती.

रक्ताचा जल्लोष चालला होता.
कुंपणं कुंपणांतून फुटत होती.
न बांधलेली खोली खोलीतून रुतत होती.

अुजेडात सांडलेले हवेचे कण
पाऊलभर पसरले होते.

## ४०. अस्तित्वाचा स्पर्श

अुन्हाच्या ज्वाळाही
होतात परक्या
तेव्हा अस्तित्वाचा पोत
कुठेतरी विरत जातो.

अंगावरच्या सगळ्याच
अुभ्या – आडव्या रेषांतून
एक रक्ताळलेला देह
सळसळत राहतो.

सगळ्याच रक्ताळलेल्या
देहाचा होम होतो
आणि ज्वाला शोधत फिरतात मला.

माझ्या ओळखीच्या श्वानगप्पा
एका ललाटासारख्या
देहावरून कोसळतात.
रक्ताची स्वाक्षरी घ्यायला
उभा देह उभा राहतो.

हातभट्टीच्या गरम लाटा
देहाखाली सळसळत असतात
पण मनातून निघणाऱ्या वाफा
उभ्या त्रिकोणात
चेहरा वेडावाकडा करत
आतडी न् आतडी
कुरतडत राहतात.

एकही नसते आसक्त आस
देहावरून हात फिरवणारी.
सावलीला पडलेल्या
दोनचार फुलांना
स्पर्श करून पाहिला
तर त्यांनीही तोंड फिरवली.

जळताही येत नाही
जळणाऱ्या दिशांनी;
फिरताही येत नाही
नसणाऱ्या दिशांनी.

## ४१. प्रवास अस्तित्वाचा

आडव्या–उभ्या भावनांना
एक स्वच्छ काळीदार रेघ
जाळी पसरवणारी.

पक्ष्यांचे किलबिलते आवाज
जाळीदार नक्षीला सोबत करणारे.

अखेर रात्र जागवायची असते !
जाळी पांघरायची असते !
आणि किलबिलही ऐकायची असते !

विश्वाचे झोके दरीदरीतून
वरखाली कोसळत असतात.
रंग असतात वेडेवाकडे
काळ्या वाटेत न्हालेले.

एकटीच धुराडी घेऊन शेकत बसायचं.
वेडीवाकडी विनाकारण डोलणारी झाडं
पाहात बसायचं.

हाताला लागलेला काळा रंग
उसाच्या चिपाडासारखा
पिळत रहायचं.

निवान्त पसरलेली दांडगी ऊब
अक्षरओळख करून घेताना
रस्त्यानं रेटत न्यायची.

रस्ताही ओळखायचा
काळ्या निशाणांनी सारवलेला.

मग
काठी टेकत टेकत
चालणाऱ्या अस्तित्वाला
हात देत देत
घरात नेऊन ठेवायचं
एकदाचं.

## ४२. विश्वाच्या पार्श्वभूमीवर

विशाल धरतीच्या घोटावर
एकेक अश्रू
चापून चोपून बसवलेला.
विश्वव्यवस्थेच्या पाया पडून
एकेक घास
ऐसपैस विस्तारलेला.

उघडचा बागडचा शरीराचा
दिवसभर चाललेला नंगानाच
ओठ पिळून काढताना
रक्त रक्त पुसत गेलेली रात्र.

ओठावर टिकलेले कवडसे
केविलवाण्या
आरशात डोकावताता
अंधुक अंधुक होत चाललेले.

चालताना लंब्या लंब्या काठचा
आपला आवाज
कोरत चाललेल्या.

मी हातात धरलेली
माझी दोन पावलं
आशाळभूत नजरेनं
माझ्याकडे पाहणारी.

कुशीत निजणाऱ्या छायेला
जरा हलवून जागं केलं.

पावलं पुसताना
रिकामी पडलेली
चांदण्या फुलांची लहर
आकाशाच्या ढगाळ आकृतीत
चिणून गेलेली.

## ४३. दृष्टी

रानात कोठे लाकडं टाकली.
हिरवळी वेचून खाल्ल्या.
मातीचा वास घेऊन पाहिला.
रक्त ओरबाडून पाहिलं —
रगतदार खोक्यातून
पावलांच्या खुणा चाखून पाहिल्या.

आता सरही ओसंडली होती.
थेंब थेंब गळणाऱ्या पाण्यातून
पेटते रंग पुसून पाहिले.
न चुकणाऱ्या बुद्धिबळाचा डाव
चुकवून पाहिला.

आशेच्या नखऱ्यात
केस पिकलेली
म्हातारी उभी होती.

ढगाळलेल्या वस्त्रगाळ आकाशात
खदखदा हसणारा
राक्षस बसला होता.

मी मात्र पाहात होते
फक्त
उडत जाणारे दोन पक्षी
पक्षाळलेल्या डोळ्यात.

## ४४. वादळ

वादळ उठून गेलं ठेचकाळत तर...
अुमलत्या क्षणी, निसटत्या क्षणी
उडायचं माहित असतं फक्त
पानांना
फुलांना
कागदांना
धूलिकणांना.

बिचाऱ्याची पावलं
कोणी मोजलीत ?
खोली कोणी मापून
पाहिलीय ?
लांबी कोणाला कळलीय ?
रुंदी ठोकळ्यागत
कोणी संभाळलीय ?

कोणी पाहिलंय
त्याचं जळतं मन ?
ठिबकणारे अश्रू ?
थरथरणारं सिंहासन ?

त्याच्या थिरकत्या पावलांना
कोणी पाणी पाजलंय
जीवाच्या द्रोणातून ?

त्याच्यावरच्या
लाल रक्तांचा काचांचा चुरा
कोणी हृदयाशी दाबलाय ?
त्याच्या हाताला पडलेले घट्टे
कोणी प्रेमाच्या मलमानं कुरवाळलेत ?

विचारलाय कधी ओला प्रश्न
'तुला अजून रक्तात रंगून किती हत्या
करायच्यात रे ?'

## ४५. सांगता

एका अंधाऱ्या पहाडात
गुदमरलेल्या फुलासारखा
एक काळाकभिन्न खडक,
माझ्या डोळ्यांची
वाट पाहात होता.

संथ पाऊलवाटांवर
एक चौपदरी फडकं लावून
मी फूल उडवून लावलं.
निशाणी फुटली ;
तेव्हा हलकेच फुंकर घातली.

रक्ताळलेल्या ओठांवर
चिकटले होते
फक्त
राखेचे कण.

## ४६. माणूस

माणूस म्हणजे स्व.
स्वपासूनच त्याचा स्वार्थ.
स्वपासूनच त्याचा परमार्थ.
स्वार्थ संपला माणूस संपला.

स्वच्या स्वप्नाळू स्वर्गात
त्याला जीवन मिळतं.
स्वभोवती फिरणाऱ्या
रानवाऱ्याच्या
ऊन ऊन उसाशात
त्याला जीवनाचं
अर्घ्य मिळतं.

हाकच मारली तर
आभासातच सर्व अर्थ.
साथच शोधली तर...
हाकही संपून जाईल
अर्ध्यावरच.

अज्ञानात कशी
आबादी आबाद.
ज्ञान झालं की
सगळंच कसं रुक्ष
वाळवंट.

## ४७. चक्र

जन्म...
मृत्यू...
एकाकीपणा...
चिमणीचं इवलंसं पिल्लू
टिपलेला दाणा.
हरवलेली क्रांती
न पेटलेली मशाल.
रिंगणातल्या चाबकाला
माराचा आधार.

गगनचुंबी इमारती
झोपडपट्टीच्या वाटा.
दरीदरीतून कोसळलेल्या
हिमनदीच्या हिमवाटा

खडकावर धोपटलेली
रक्ताळलेली मनं.

पाऊलवाटेच्या जखमी उरात
एक शेवाळलेली पहाट उगवते.
पडदे मिटलेले असतात भोवतीचे –
फक्त एक निसरडी हालचाल
मृत्यूच्या एकतारीवर
गात असते
सूर बनून.

## ४८. हिरवा तळ

काटेकोर वाहणारे
जखडलेपणाचे प्रवाह
एकात एक भिजून जातात
आणि एक अनामिक संध्याकाळ
संधिप्रकाशात असलेल्या नसलेल्या रंगांचं
स्थिर अस्थिर किनारींचं
एक जिवन्त शिल्प
रेखाटत राहते.

पावसाळ्यात पाय रुतून बसलेल्या
जीवघेण्या तारा
करवतींचे कोनाडे उबवत उबवत
प्लॅस्टिकच्या सरदारी घराण्यात
काही विसरलेलं राहिलेलं अडकलेलं
रक्ताचं नातं
कोरत राहतात.

पुसलेल्या अर्थाकृती
पाय सोडून उन्हात बसलेल्या असताना
लाटांचे कोवळे अंकुर
अंगाखांद्यावर खेळवताना
फडफडणाऱ्या प्रतिबिंबांचे विश्वरूप दर्शन
पावलांचे कवडसे उमटवत राहतं.]

न्याहाळलेल्या फुलपाखराची
निळीशी सोबत
आकाश तर्र असताना
हुलकावणाऱ्या डहाळीच्या
हिरव्या फुलाशी
आदिमातेच्या हिरव्या तळाचं
गुपित शृंगारत राहते.

## ४९. प्रवास हालचालींचा

रंग
माझ्या गहिऱ्या आकृतीचे मणिबंध
लपवून ठेवलेल्या बेवारशी पानांच्या
पुरून ठेवलेल्या
मातीच्या थडग्यातले.

मी पाणी पीत पीत राहिले
घोट रिचवत राहिले.
तहान संपली नाही
घोट संपले नाहीत.
पाण्यावरचे तरंग मात्र
माझे उरले नाहीत.

ही जाणीव ठेवून
मी प्रेत उकरायला सुरवात केली –
अजूनही होती एक रिकामी घागर
माझ्या उशाशी.

उकललेल्या नात्याची एक माळ
आता मी विकत घेतली होती.
थोडा रंगही फासला होता चेहेऱ्यावर.

असलेल्या नसलेल्या जाणिवांचा
एक सुप्त बोगदा
मला घेऊन चालला होता.

## ५०. अलिप्त

व्यक्ती - व्यक्तींचा संभोग
डोळयांना पाहायचा.
तृप्ती - अतृप्तीचे घोट
निर्माण करायचे.
वास्तवाचा वारा प्यायचा.
निवारा घ्यायचा हिरव्या फुलापाशी.
रक्ताळलेल्या रस्त्यांना
आपलंसं करायचं
गती बनण्यासाठी.

गतीचा असतो फक्त गतीशी संवाद.

निरर्थकतेच्या पायावर घालून घेतलेले
कोमेजलेपणाचे लाडके लेकरू
आदिमायेच्या पायावर बळी द्यायचे
आणि मग उभं रहायचं
हसऱ्या चांदण्यांचा वेध घेत
पांढऱ्या शुभ्र प्रकाशाचा झोत
सहन करत
आकाशाखाली
आयुष्यभर.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४६९
दा. क्र. २३.६६९
काव्य २५५७४
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0023668
REFBK-0023668

## ५१. सहज

शांत स्वच्छ रस्त्यावर
रक्त का शिंपायचं ?

सगळ्यांचे संदर्भ
जाळून टाकलेत –
आता ओठावर प्यालेल्या जहराचे
रंग तरी कशाला ठेवायचेत ?

रक्ताळलेल्या पायातून
माती वाहात राहते.
नसानसातून थांबलेला आक्रोश
रस्ते बनवत राहतो.

मीपणात उगवलेली झाडं
रक्तात भिजत राहतात.
चिन्ह झालेल्या पानाफुलांना
रक्ताची नाती फुटत राहतात.

सूज येईपर्यंत कोरलेलं
इन्द्रधनुष्य
आकाश पेलत राहतं.